# MAHARASHTRA POLLUTION CONTROL BOARD

Phone No. 24010437 / 24020781
Visit us at : http://mpcb.gov.in
Email : jdwaterdivision@mpcb.gov.in

MAHARASHTRA

Kalptaru Point 2nd floor,
Sion Matunga Scheme Road
No. 8, Infant of Sion Cercal,
Sion (E), Mumbai – 400 022.

"Your Service is our Duty"

No./MPCB/JD(WPC)/ENV/PH/B- 241118- FTS-0055 Date: 18/11/2024

**To,**
**The Principal Secretary,**
**Environment & Climate Change Department.**
**Government of Maharashtra,**
**Room No. 217 (Annex) New Administration Building,**
**Mantralaya, Mumbai-400032.**

**Sub:** Environmental Clearance - Proceedings of Public Hearing in respect of **Proposed** Project for Establishment of Common Biomedical Waste Treatment & Disposal Facility (CBMWTSDF). **Proposed by** Life Secure Enterprises, A/P Karanjvihire, Tal-Khed, Dist-Pune.

**Ref:** Sub-Regional Office Pune-II vide letter dtd-13.11.2024 received on 14.11. 2024.

**Sir,**

The Public Hearing for **Proposed** Project for Establishment of Common Biomedical Waste Treatment & Disposal Facility (CBMWTSDF). **Proposed by** Life Secure Enterprises, A/P Karanjvihire, Tal-Khed, Dist-Pune.

Environmental public hearing Conducted on dtd. on dtd. 25.10.2024, Friday, Time-12.00 Noon. At M/s. Life Secure Enterprises, A/P Karanjvihire, Tal-Khed, Dist-Pune. The minutes of the public hearing approved and duly signed by the Public hearing panel along with the proceedings are enclosed.

a. Minutes of public hearing duly signed by the Chairman of public hearing panel in (English & Marathi)
b. Copy of Office Order
c. Video DVD and Photograph of Public Hearing.
d. List of participants.
e. Newspaper Notices for Environmental Public Hearing in English & Marathi.

This is submitted for further necessary action please.

**Yours Sincerely,**

**(Dr. Avinash Dhakne IAS),**
**Member Secretary**

**Encl: As above**

**Copy for information & necessary action to:**

1) The Regional Officer, MPCB, Pune
2) The Sub Regional Office, MPCB, Pune-II
3) EIC, M.P. C. Board, Mumbai - For information & display of Minutes on website.

**Copy to the applicant of the project:**

M/s. Life Secure Enterprises, A/P Karanjvihire, Tal-Khed, Dist-Pune.

**प्रकल्प प्रवर्तक मे. लाईफ सिक्युर एंटरप्रायझेस यांचा औद्योगिक भूखंड क्रमांक ५, गट नं. ३५६ (पार्ट), ३६६ (पार्ट), ३६९ (पार्ट), ३७० (पार्ट), ३७२ (पार्ट), ४०२, ४०३, ४०४, ४०५, ४०६, ४०७ आणि ४०८, मुक्काम पोस्ट- मौजे करंजविहिरे, तालुका-खेड, जिल्हा-पुणे - ४१० ५०१, महाराष्ट्र राज्य येथे प्रस्तावित सामाईक जैव-वैदकीय कचरा प्रक्रिया, साठवण आणि विल्हेवाट सुविधा (Common Bio-Medical Waste, Treatment, Storage & Disposal Facility - CBMWTSDF) प्रकल्प स्थापन करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचे इतिवृत -**

---

प्रकल्प प्रवर्तक मे. लाईफ सिक्युर एंटरप्रायझेस यांचा औद्योगिक भूखंड क्रमांक ५, गट नं. ३५६ (पार्ट), ३६६ (पार्ट), ३६९ (पार्ट), ३७० (पार्ट), ३७२ (पार्ट), ४०२, ४०३, ४०४, ४०५, ४०६, ४०७ आणि ४०८, मुक्काम पोस्ट- मौजे करंजविहिरे, तालुका-खेड, जिल्हा-पुणे - ४१० ५०१, महाराष्ट्र राज्य येथे प्रस्तावित सामाईक जैव-वैदकीय कचरा प्रक्रिया, साठवण आणि विल्हेवाट सुविधा (Common Bio-Medical Waste Treatment, Storage & Disposal Facility- CBMWTSDF) प्रकल्प स्थापन करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी शुक्रवार, दिनांक २५ ऑक्टोबर, २०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यात आलेली होती.

श्री. बाबासाहेब कुकडे, उप प्रादेशिक अधिकारी, पुणे-२, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे तथा आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सौ. ज्योती कदम, अपर जिल्हादंडाधिकारी, पुणे तथा अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री जगन्नाथ साळुंखे, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे तथा सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, चॅनलचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत करुन माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे असा आहे.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मे. लाईफ सिक्युर एंटरप्रायझेस यांचा औद्योगिक भूखंड क्रमांक ५, गट नं. ३५६ (पार्ट), ३६६ (पार्ट), ३६९ (पार्ट), ३७० (पार्ट), ३७२ (पार्ट), ४०२, ४०३, ४०४, ४०५, ४०६, ४०७ आणि ४०८, मुक्काम पोस्ट- मौजे करंजविहिरे, तालुका-खेड, जिल्हा-पुणे- ४१० ५०१, महाराष्ट्र राज्य येथे प्रस्तावित सामाईक जैव-वैदकीय कचरा प्रक्रिया, साठवण आणि विल्हेवाट सुविधा (Common Bio-Medical Waste Treatment, Storage & Disposal Facility - CBMWTSDF) प्रकल्प स्थापन करणेबाबत पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करणे संदर्भात दिनांक ३१-०७-२०२४ रोजीचा अर्ज मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्राप्त झाला.

सदरहू प्रस्तावित प्रकल्प पर्यावरण अधिसूचना क्रमांक १५३३ ( ई ) दिनांक १४-०९-२००६ आणि सुधारित अधिसुचना दिनांक १७-०४-२०१५ नुसार संवर्ग - बी-१, शेड्युल ७ (डीए) यात मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास राज्यस्तरीय तज्ज्ञ मुल्यांकन समिती (State Level Expert Appraisal Committee - SEAC), महाराष्ट्र आणि राज्य पर्यावरण आघात मुल्यांकन प्राधिकरण (State Environment Impact Assessment Authority - SEIAA), महाराष्ट्र यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी राज्य पर्यावरण आघात मुल्यांकन प्राधिकरण (State Environment Impact Assessment Authority - SEIAA), महाराष्ट्र यांची प्राथमिक मान्यता (ToR) प्राप्त करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज दिनांक ०४-०७-२०२४ रोजी सादर केला व त्यास अर्जास राज्य पर्यावरण आघात मुल्यांकन प्राधिकरण (State Environment Appraisal Committee - SEAC) यांनी ऑनलाईन मंजूरी दिनांक २५-०७-२०२४ रोजी प्रदान केली.

त्यानुसार, प्रकल्प प्रवर्तकांनी भारत सरकारचे नाबेट प्रमाणपत्र प्राप्त असलेल्या पर्यावरण सल्लागार नियुक्त करुन प्रस्तावित प्रकल्पाच्या १०.० किमी परिघातील संपूर्ण क्षेत्राचे तपशीलवार पर्यावरण सर्वेक्षण केलेले आहे. सदरहू प्रकल्प स्थापनेमुळे

पर्यावरणावर होणा-या संभाव्य परिणामांचा अभ्यास करुन प्रारुप पर्यावरण आघात मूल्यांकन (Draft EIA) अहवालाचा मसुदा तयार करण्यात आला आणि तो सादर करण्यात आलेला आहे.

सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी पत्र दिनांक २३/०८/२०२४ नुसार उप प्रादेशिक कार्यालय,पुणे-२, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे यांना पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्याची प्रक्रिया राबविण्याची सूचना केली.

उप प्रादेशिक कार्यालय, पुणे-२, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे यांनी पत्र दिनांक १३-०९-२०२४ रोजी मा. जिल्हाधिकारी,पुणे यांना सदरहू प्रकल्पाबाबत पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्याची विनंती केलेली होती.

मा. जिल्हाधिकारी, पुणे यांनी त्यांच्या पत्र दिनांक १३-०९-२०२४ नुसार प्रत्यक्ष (Physical) पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्यास शुक्रवार, दिनांक २५ ऑक्टोबर, २०२४ रोजी दुपारी १२. ०० वाजता मान्यता दिल्यानंतर मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी कार्यालयीन आदेश क्रं. ई- १६७ / २०२४, व्दारा पत्र क्रं. बीओ / जेडी (डब्लुपीसी)/पीएच/बी-२४१०२३- एफटीएस-००८६ दिनांक २३-१०-२०२४ अन्वये भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना एस.ओ. क्रं. १५३३, दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना एस. ओ. ३०६७ (इ), दिनांक ०१-१२-२००९ अनुसार खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

| | |
|---|---|
| १) जिल्हादंडाधिकारी, पुणे,<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>(अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा<br>कमी दर्जाचा नसावा) | - **अध्यक्ष** |
| २) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई<br>यांचे प्रतिनिधी -<br>प्रादेशिक अधिकारी - पुणे,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>पुणे | - **सदस्य** |
| ३) उप प्रादेशिक अधिकारी, पुणे-२,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>पुणे | - **आयोजक** |

सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक अधिकारी,पुणे-२, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्र दैनिक लोकसत्ता यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र इंडियन एक्सप्रेस यात इंग्रजीत दिनांक २४-०९-२०२४ रोजी जनसुनावणी सूचना सर्व जनतेस अवगत करण्यासाठी प्रकाशित केलेली होती. त्याचप्रमाणे सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज लोकांच्या माहितीकरीता खालील अधिसूचित कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते -

१) क्षेत्रीय कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, न्यु सेक्रेटरिअल बिल्डिंग तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर-४४० ००१,
२) मा.जिल्हाधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे
३) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र,
४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय,पुणे,
५) उप-विभागीय अधिकारी,मावळ-मुळशी उप-विभाग,पुणे, तलाठी प्रशिक्षण केंद्र,बावधन, तालुका-मुळशी,जिल्हा-पुणे,
६) उप-विभागीय अधिकारी, खेड, तालुका-खेड,जिल्हा-पुणे,
७) तहसीलदार, मावळ, तालुका-मावळ,जिल्हा-पुणे,
८) तहसीलदार, खेड, तालुका-खेड,जिल्हा-पुणे,
९) ग्रामपंचायत कार्यालय- नवलाख उंब्रे (बाधलवाडी), बाधलवस्ती, जाधववाडी,मेंढेवाडी), आंबळे, इंदोरी, निगडे, आंबी, मंगरुळ, जांबवडे, राजपुरी, पवळे, तालुका-मावळ,जिल्हा-पुणे,
१०) ग्रामपंचायत कार्यालय-करंजविहिरे, आसखेड बु.,आसखेड खुर्द, शिवे(वाकी तर्फे वाडा,वहागाव,रौदळवाडी), पैट, वासुली, भांबोली, सदुंब्रे, सुदवडी, धामणे, सावरदरी, कुर्कुंडी, कोरेगाव बु., कोये, किवळे, तालुका-खेड, जिल्हा-पुणे,
११) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,
१२) मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, ३रा मजला, सायन माटुंगा स्कीम रोड नं. ८, सायन (पूर्व), सायन सर्कल जवळ, मुंबई - ४०० ०२२,
१३) प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, तिसरा मजला, जोग सेंटर, दुसरा व तिसरा मजला,जुना पुणे-मुंबई रस्ता,वाकडेवाडी, पुणे -०३

१४) उप प्रादेशिक अधिकारी, पुणे-२, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, तिसरा मजला, जोग सेंटर, दुसरा व तिसरा मजला,जुना पुणे-मुंबई रस्ता,वाकडेवाडी, पुणे - ४११ ००३

१५) संकेत स्थळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई

आजतागायत उपरोक्त प्रकल्पाविषयी उप प्रादेशिक अधिकारी, पुणे-२, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे यांना ०१ सूचना/आक्षेप ई-मेलव्दारे प्राप्त झालेले आहेत.

आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास ती संधी देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले.

आयोजक यांनी प्रतिपादन केले की ही समिती फक्त लोकांचे पर्यावरणविषयक मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून प्रकल्प संमत करणे, नाकारणे किंवा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. स्थानिकांनी जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना/आक्षेप यांची इतिवृतात नोंद घेण्यात येईल व त्याचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीचे व्हिडिओ रेकॉर्डींग, जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना/आक्षेप, बैठकीचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांना मा. अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यातर्फे सादर करण्यात येत असते. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. आयोजक यांनी अध्यक्षांना प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी व प्रकल्पातील पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी सादरीकरण केले. त्यांनी सांगितले की वापरण्यात आलेला जैव-वैदकीय कच-याची शास्त्रियदृष्ट्या विल्हेवाट न लावल्यास तो सर्व मानव जातीस, प्राण्यांना धोकादायक होऊ शकतो.

सदरहू प्रकल्प हा जैव-वैदकीय कचरा शास्त्रीयदृष्ट्या प्रक्रिया व विल्हेवाट लावणार आहे. सदरहू प्रकल्पासाठी गुंतवणूक ही ५७४.० लाख असून सदरहू प्रकल्प स्थळ हे केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिनांक २१ डिसेंबर, २०१६ रोजी पारित केलेल्या निर्देशांनुसार आहे.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की सदरहू प्रकल्पासाठी मावळ, खेड, जुन्नर, खालापूर - (खोपोली-जिल्हा-रायगड), हवेली, मुळशी, शिरुर या तालुक्यातील आणि देहूरोड लष्कर छावणी या क्षेत्रातील जैव-वैदकीय कचरा गोळा करण्यास परवानगी मिळालेली आहे. जैव-वैदकीय कचरा हा कलर-कोडेड क्लोरिनेट नसलेल्या एचडीपीई पिशव्यांमधूनच गोळा करण्यात येतो, त्यामुळे अप्रत्यक्षपणे अशा पिशव्या ब-याच प्रमाणात लागत असल्याने स्थानिकांना रोजगार व उत्पन्नाचे साधन उपलब्ध होऊ शकते. सदरहू कचरा हा पारित निर्देशांनुसार वरिल क्षेत्रातून बंद चिन्हांकित गाडीतूनच (Closed vehicles with marking) आणण्यात येईल. वैदकीय सेवा पुरविणारी छोटी नर्सिग्स होम्स, क्लिनिक्स आणि इतर तत्सम वैदकीय संस्था ज्यांना खर्चिक असणारी जैव-वैदकीय प्रक्रिया व हाताळणी सुविधा करणे शक्य नाही, त्यांना केंद्रिकृत असणारी जैव-वैदकीय प्रक्रिया व हाताळणी सुविधेची आवश्यकता आहे. तसेच जैव-वैदकीय कचरा व्यवस्थापन नियम, २०१६ (सुधारित २०१८ आणि २०१९) नुसार ७५.० कि.मी. परिघात जर सामाईक जैव-वैदकीय कचरा प्रक्रिया सुविधा उपलब्ध असल्यास वैयक्तिक प्रक्रिया व हाताळणी सुविधा उभारण्यास परावृत्त (discourage) करते. सदरहू प्रकल्प प्रवर्तकांची MIMER वैदकीय महाविद्यालय, तळेगाव दाभाडे, जिल्हा-पुणे येथे सामाईक जैव-वैदकीय कचरा प्रक्रिया सुविधा गेले बारा वर्षे कार्यरत असून जैव-वैदकीय कचरा व्यवस्थापन हे मावळ, खेड, हवेली, जुन्नर, आंबेगाव आणि मुळशी, शिरुर तालुके आणि खालापूर-जिल्हा रायगड या तालुक्यात पुरवित आहे.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की समाजाच्या गरजांनुसार आरोग्य सेवा आस्थापना, जैविक प्रयोगशाळा, पॅथॉलॉजिकल प्रयोगशाळा, संशोधन प्रयोगशाळा आणि पशुवैदकीय कच-यात पुणे, रायगड जिल्ह्यात प्रचंड प्रमाणात वाढ झालेली आहे. त्यामुळे सामाईक जैव-वैदकीय कचरा प्रक्रिया सुविधा ही ५०.० किलो प्रति तास पूर्ण कार्यक्षमतेने म्हणजे वीस तास प्रति दिन जर कार्यरत ठेवला, तरीही मोठ्या प्रमाणात उत्पन्न होणा-या जैव-वैदकीय कचरा हाताळणीस अपूरा पडतो. त्यामुळे प्रकल्पातील विविध सयंत्रणांवर अवाजवी दाब (लोड) पडल्याने त्या सयंत्रणेची देखभाल सारखी करण्यासाठी काही कालावधीसाठी प्रकल्प हा बंद ठेवावा लागतो.

पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पातील पर्यावरण व्यवस्थापन योजनेची सविस्तर माहिती देताना सांगतिले की प्रकल्पात येणारा घातक घन कचरा (Solid Hazardous Waste), बॅटरी वेस्ट, ई-वेस्ट हे मान्यताप्राप्त रिसायकर्सनाच पुढील प्रक्रियेसाठी पाठविण्यात येतील. तर प्रकल्पातील कचरा जाळल्यानंतर उत्पन्न होणारी राख, रासायनिक स्लज हे सामाईक घातक कचरा, प्रक्रिया, साठवण, विल्हेवाट केंद्र

(CHWTSDF), रांजणगाव, जिल्हा-पुणे येथे पुढील प्रक्रियेसाठी रवाना करण्यात येईल.

सादरीकरण करत असताना काही उपस्थितांनी एकत्रितपणे मंचकावर येऊन प्रकल्पाबाबत आक्षेप नोंदविणारी निवेदने मा. अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना सादर केली.

सदरहू व्यक्तींचा समूह गेल्यानंतर परत पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले कुठलाही कच-याची जास्त वेळ नुसतीच साठवण केल्यास त्यापासून दुर्गंधी येते. तरी सदरहू कच-यावर त्वरित प्रक्रिया करण्यात येईल. प्रकल्पातील कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांना वेळोवेळी प्रशिक्षण देण्यात येईल, तसेच वेळोवेळी त्यांची वैदकीय तपासणी करण्यात येईल.

प्रकल्पात स्वतंत्र असा पर्यावरण व्यवस्थापन कक्ष उभारण्यात येईल. तसेच प्रकल्पात सभोवताली हरितपट्टा विकास करण्यात येईल.

**<u>सादरीकरण पुर्ण झाल्यानंतर -</u>**

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी यांनी सांगितले की जनसुनावणी दरम्यान ग्रामपंचायत करंजविहिरे यांच्याकडून लेखी निवेदन प्राप्त झालेले आहे. त्यांनी प्रस्तावित प्रकल्पास विरोध दर्शविलेला आहे. सदर प्रकल्पास परवानगी देण्यात येऊ नये असे त्यांनी उदघृत्त केलेले आहे.

तसेच प्रदूषण नियंत्रण मंडळास ईमेलव्दारे श्री. तानाजी दिवेकर दि. २५/१०/२०२४ यांचे एक निवेदन प्राप्त झालेले आहे. त्यात प्रस्तावित प्रकल्पाच्या क्षमतेबाबत काही शंका/आक्षेप उपस्थित करण्यात आलेल्या आहेत. तरी प्राप्त झालेल्या लेखी सूचना/आक्षेपांबाबत प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागारांना लेखी निवदेन देण्याची सूचना पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीतर्फे करण्यात येत आहे. सदरहू संपूर्ण दस्तावेज शासनास सादर करण्यात येईल.

अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी त्यांचा विशेष आक्षेप (Main Objection) काय आहे याबाबत विचारणा केली. आयोजक यांनी उत्तर दिले की प्रकल्पाच्या क्षमतेबाबत (CAPACITY) शंका विचारल्या आहेत. प्रस्तावित प्रकल्प हा आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य आहे का याबाबत आक्षेप नोंदविण्यात आलेले आहेत.

अध्यक्षा यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी सूचना/आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही सूचना, टीकाटिप्पणी, विचार किंवा आक्षेप असल्यास ते नोंदविण्यात यावेत. सूचना/आक्षेप नोंदविताना प्रथम आपले नांव व गावाचे नाव सांगण्यात यावे.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

१) श्री संतोष मरगज, राहणार-करंजविहिरे,तालुका-खेड,जिल्हा-पुणेः-

त्यांनी हातात माईक घेतला, बोलण्यास उभे राहिले.

त्यावेळीच अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की शहरातील जो जैव वैदकीय कचरा येथे येणार आहे, त्यामुळे येथील परिसरातील ग्रामस्थांना त्याचा त्रास होईल असा आक्षेप दिसत आहे. तरी सदरहू जैव-वैदकीय कच-यामुळे पर्यावरणास धोका न होण्यासाठी काय उपाययोजना करणार आहात याबाबत स्पष्टीकरण देण्यात यावे. उदाहरण सांगायचे म्हणजे की जसे की सादरीकरणात सांगण्यात आले की कुठल्याही वेस्टचा वास येतो, तो वेस्ट आपण प्रकल्पातच जिरविणार आहात, त्यामुळे या भागातील ग्रामस्थांवर काही संभाव्य दुष्परिणाम, आरोग्य समस्या उद्भवतील काय व त्याबाबत कंपनी काय उपाययोजना करणार आहे, याचे संपूर्ण स्पष्टीकरण उपस्थितांना परत सांगण्याची सूचना केली.

पर्यावरण सल्लागार यांनी परत स्पष्टीकरण देताना सांगितले की या प्रकल्पाचे जे वैशिष्ट्य आहे प्रकल्पात येणारा कचरा हा नुसता कचरा नाही, तर तो जैव वैदकीय कचरा आहे. हा कचरा दवाखाने, हॉस्पिटल यामध्येच तयार होणार आहे. दवाखान्यात, हॉस्पिटलमध्ये विशिष्ट रंगाच्या प्लॅस्टिक थैल्या उपलब्ध करण्यात आलेल्या असतात. तो कचरा बंद विशिष्ट वाहनामधूनच आणला जाणार आहे. तो जैव वैदकीय कचरा कुठेही बाहेर टाकला जाणार नाही. तो कचरा येथील केंद्रावरच येणार आहे. त्या जैव वैदकीय कच-याची शास्त्रीयदृष्ट्या विल्हेवाट ही या केंद्राच्या आतच करण्यात येणार आहे. पिवळा, लाल, निळा आणि पांढरा रंगाच्या कचरा थैल्या/Dust Bins या आरोग्य केंद्रातच असणार आहेत. हा प्लॅस्टिक पिशव्यात भरून बंद विशिष्ट वाहनांमधूनच केंद्रात आणला जाणार आहे. इतर कुठल्याही वाहनांमधून आणण्यास बंदी आहे. येथे कचरा आणल्यानंतर जो जैव-वैदकीय कचरा जाळण्यायोग्य असेल, तो जाळण्यात येणार आहे. जैव वैदकीय कचरा जाळल्यामुळे कुठलेही हवा प्रदूषण होत नाही. कचरा जाळल्यानंतर उत्पन्न होणारी राख ही बंधिस्थ वाहनांतूनच

रांजणगाव येथील सामाईक घातक घन प्रक्रिया आणि विल्हेवाट व्यवस्था) कचरा (CBWTDF) केंद्रास पुढील प्रक्रियेसाठी पाठविण्यात येईल.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की स्थानिकांना या प्रक्रियेमुळे हवा प्रदूषण होईल अशी भिती वाटते. तर येथे हवा प्रदूषण नियंत्रणासाठी व्हेन्चुरी स्क्रबर ही अत्याधुनिक संयंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार असून प्रकल्पात ३०.० मीटर उंचीची चिमणी/स्टॅक कार्यान्वित करण्यात येणार आहे. चिमणीतून जो धूर बाहेर पडेल, त्यात कुठलेही धुलीकण असणार नाही.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रकल्पातील ध्वनी प्रदूषणाचा मुख्य स्त्रोत म्हणजे इन्सिनरेटर आणि डी.जी.सेट. जर विद्युत पुरवठा खंडीत झाला, तरच डी.जी.सेट वापरण्यात येणार आहे. ध्वनी प्रदूषण नियंत्रण संयत्रणा प्रकल्पात कार्यान्वित करण्यात येणार असल्याने परिसरातील ग्रामस्थांना याचा काहीही त्रास होणार नाही. प्रकल्पात जे सांडपाणी उत्पन्न होईल, त्यासाठी २५.० केएलपीडी ईटीपी–हा प्रकल्पातच कार्यान्वित करण्यात येईल. सांडपाण्यावर प्रक्रिया केल्यानंतर प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा प्रकल्पातच पुनर्वापर करण्यात येईल. ते प्रकल्पाबाहेर सोडण्यात येणार नाही. सदरहू प्रकल्प हा शून्य द्रव निःस्सारण (झिरो लिक्विड डिस्चार्ज) प्रकल्प असणार आहे.

२) **श्री अर्जुन सुपेकर, राहणार -करंजविहिरे,तालुका-खेड,जिल्हा-पुणेः-**

प्रकल्पात उत्पन्न होणा-या वासाबद्दल सर्वांना माहिती सांगण्यात यावी.

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की स्थानिकांना या प्रकल्पापासून होणा-या दुर्गंधीचा त्रास होईल अशी भिती वाटते. तर प्रकल्पातील दुर्गंधी व्यवस्थापन हे दोन टप्प्यात करण्यात येणार आहे.

पहिले म्हणजे जैव-वैदकीय कच-याची वाहतुक ही फक्त बंधिस्त वाहनांमधूनच करण्यात येईल. ती सर्व वाहने लिक प्रुफ म्हणजे त्या वाहनांमधून कुठल्याच प्रकारची गळती होणार नाही.

तसेच जैव वैदकीय कचरा हाताळणी करण्यासाठी जे मदतनीस असतील, त्यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे जैव वैदकीय कच-याचे संकलन करण्यासाठीही प्रशिक्षण देण्यात येईल. तसेच निर्माण झालेला जैव-वैदकीय कचरा आणि त्यावर प्रक्रिया ही फक्त ४८ तासांतच करण्यात येईल. ४८ तासांच्यावर येथे जैव-वैदकीय कचरा हा साठविला जाणार नाही. त्यामुळे कुठल्याही प्रकारची दुर्गंधी ही तयारच होणार नाही, म्हणजे परिसरातील ग्रामस्थांना प्रकल्पापासून दुर्गंधीचा

कुठल्याही प्रकारे त्रास होणार नाही. तसेच प्रकल्पात सर्व बाजूंनी हरितपट्टा विकसित करण्यात येणार आहे. तसेच प्रकल्पात खेळती हवा व स्वच्छता याबाबत काटेकोरपणे पालन करण्यात येणार आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांना दुर्गंधीचा कुठलाही त्रास होणार नाही.

३) **श्री जगन्नाथ साळुंखे, सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणेः-**

प्रकल्पातील वा-याची दिशा, पाण्याचा स्लोप - प्रकल्पात उत्पन्न होणारे सांडपाणी याचा स्लोप हा नदीच्या बाजूला आहे. जो वारा वाहिल, तो गावाच्या दिशेने वाहणार आहे. तरी जरी ४८ तासापेक्षा जास्त काळ जैव वैदकीय कचरा राहणार नसला, स्थानिक लोकांच्यामध्ये याबाबत भिती निर्माण झालेली आहे. त्यासाठी तरीही याबाबत मानांकने (prescribed standards) हे जास्त कडक करणे आवश्यक आहे. एका बाजूला निसर्ग-नदी, तर प्रकल्पातील सांडपाणी नदीच्या बाजूने जाणार आहे. लोकांमध्ये याबाबत भिती आहे. त्याबाबत प्रकल्प प्रवर्तक काय उपाययोजना करणार हा स्थानिकांचा प्रश्न आहे. त्याबाबत कडक कार्यवाही (stringent action) होणे गरजेचे आहे.

दुसरी निविदा ही तांत्रिक आहे. पुणे आणि पिंपरी चिंचवड क्षेत्रात ६००.० किलो/तासाचे प्रकल्प आहेत. तरीही आपण हा प्रकल्प हाती घेतलेला आहे. तर त्याबाबत Gap Analysis अभ्यास आपण पूर्ण केलेला आहे काय? हे तांत्रिक मुद्दे विचारात घ्यावेत, म्हणजे स्थानिक जनतेची भिती दूर होईल.

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर देताना सांगितले की Gap Analysis अभ्यास करण्यात आलेला आहे. त्यामुळे कच-याचे जो तपशील आहे, तो सादरीकरणात दर्शविलेला आहे. आपले कार्यक्षेत्र मावळ तालुका, खेड तालुका, हवेली तालुका येथील आरोग्यसेवेत नॉन-बेडेड व्यवस्था/केंद्रे किती, तसेच बेडेड केंद्रे किती याचा लेखाजोखा अभ्यासण्यात आलेला होता. बेडेडे वैदकीय सेवाकेंद्र आहेत, तेथे ८,९५५.० बेड्स असतील. तर त्या बेड्सपासून जो जाळण्यासारखा कचरा उत्पन्न होईल, हा २७०.० ग्रॅम प्रती दिन प्रती बेड असा घेतलेला होता. आणि एकूण जैव-वैदकीय कचरा जो आपल्या कार्यक्षेत्रातच फक्त आरोग्य केंद्रातून तयार होईल, तो २.४२ मे.टन/दिन इतका असणार आहे. तर बाकीचा जो जैव-वैदकीय कचरा हा सगळा मिळून ४.६७ मे.टन/दिन इतका होईल.

४) **श्री उत्तम बाजारे, राहणार-करंजविहिरे, तालुका-खेड, जिल्हा-पुणेः-**

प्रकल्पात उत्पन्न होणा-या सांडपाण्याची विल्हेवाट कोणत्या पध्दतीने करणारा आहात याबाबत माहिती सांगण्यात यावी.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की प्रकल्पात उत्पन्न होणारे औद्योगिक सांडपाण्यावर औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया केंद्रात (ETP) प्रक्रिया करण्यात येईल व प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा प्रकल्पातच पुनर्वापर करण्यात येणार आहे. सदरहू प्रकल्प हा झिरो लिक्विड डिस्चार्ज - शून्य द्रव निःस्सारण प्रकल्प असून प्रकल्पातून प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा एकही थेंब प्रकल्पाबाहेर सोडण्यात येणार नाही. येथे औद्योगिक सांडपाणी क्षमता ही जास्त घेण्यात आलेली आहे. तसेच पावसाच्या पाण्याचाही विचार करण्यात आलेला आहे. पावसाच्या पाण्याचा परिणाम हा ETP वर होणार नाही. औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया केंद्रात (ETP) हे प्रकल्पाच्या आत बंधिस्थ असणार आहे. पावसाच्या पाण्याचा त्यावर प्रभाव पडणार नाही. पावसाचे पाणी पुनर्भरण (Rain Water Harvesting) केल्याने त्याचे बरोबर नियोजन केले जाईल.

त्यावेळी श्री बाजारे यांनी बरोबर नियोजन म्हणजे कसे करणार? त्यावेळी प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले ही पावसाचे अतिरिक्त पाणी हे टाकीत जमा करुन नदीला सोडण्यात येईल.

त्यावेळी पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की प्रकल्पात जे पावसाचे पाणी पडेल, ते रुफटॉपवर हार्व्हेस्टींग आणि सरफेस हार्व्हेस्टींग म्हणजे जे जमिनीवर पडणार आहे, ते चॅनेलव्दारे व पाईपलाईनव्दारे एका ठिकाणी साठवणार आहोत. अंदाजे जेवढे पावसाचे पाणी होईल, ते मोजलेले आहे आणि त्याच्यापेक्षा जास्त क्षमतेची साठवण टाकी ही प्रकल्पाच्या आतच बसविलेली आहे. प्रकल्पातील हरितपट्टा विकासासाठी त्याचा वापर करण्यात येईल. कुठलेही पाणी प्रकल्पाबाहेर जाणार नाही.

५) **श्री संतोष कोळेकर, स्थानिक रहिवाशी, तालुका-खेड, जिल्हा-पुणे**ः-परिसरात एक प्रकल्प सुरु करताना त्यावेळी त्या कंपनीचे व्यवस्थापन असेच सांगत होते की प्रकल्पातील पाणी बाहेर सोडण्यात येणार नाही. यावेळी एवढा पाऊस झाला की स्वयंचलित दुचाकीसुध्दा जाऊ शकत नव्हती. पण जर प्रकल्पातील सांडपाणी पावसाच्या पाण्याबरोबर एकत्रित झाले, तर खालील भागात आमच्या शेती आहेत, त्या संपूर्ण नष्ट होतील. शेतीवर जनावरे आहेत. आता नदीचे पाणी हे काचेसारखे स्वच्छ आहे, ते आम्ही पिऊ शकतो. तसेच प्रकल्पातून जो धूर सोडण्यात येईल, त्यामुळेसुध्दा परिसरात दुःपरिणाम होतील. या सर्व गोष्टींचा विचार करुनच लोक विरोध करत आहेत.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी संबंधित कंपनीविरुध्द योग्य ती कारवाई करण्याचे आश्वासन दिले.

६) **श्री संतोष मरगज, मुक्काम पोस्ट- करंजविहिरे, तालुका-खेड, जिल्हा-पुणेः-**

एका शेतक-याची शेती त्या कंपनीच्या खालील बाजूस आहे. पावसाळ्यात त्याच्या शेतीचे नुकसान झाले. नुकसान झाल्यानंतर काहीही होत नाही, विरोध केला तरच फायदा होतो. तरी आमच्या सर्व ग्रामस्थांचा या प्रकल्पाला विरोध आहे. परिसरातील सर्व गावातील ग्रामस्थांना जागरुक करुन या प्रकल्पाची माहिती देण्यात येईल. पंचक्रोशीतील सर्व नागरिक या प्रकल्पाच्या विरुध्द तीव्र आंदोलन करु. या प्रकल्पास आमचा कायमस्वरुपी विरोध राहिल.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मा. अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या वतीने सांगितले की प्रकल्प प्रवर्तकांच्या पर्यावरण सल्लागार यांनी करंजविहिरे व परिसरातील गावांमधून जी निवेदने प्राप्त झालेली आहेत, त्यांची एक बैठक आयोजित करुन प्रकल्पाविषयी माहिती सांगण्यात यावी. त्यामुळे त्यांच्या प्रकल्पाविषयी काही शंका व गैरसमज दूर होतील. ही बैठक ग्रामपंचायत कार्यालयात आयोजित करण्यात यावी.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी परत एकदा उपस्थितांना त्यांचे प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही सूचना, प्रश्न, आक्षेप असल्यास ते उपस्थित करण्याचे आवाहन केले. तसेच जर कोणालाही लेखी निवेदन सादर करावयाचे असल्यास तेही सादर करु शकतात. त्याची पोच देण्यात येईल.

आयोजक यांनी पुन्हा उपस्थितांना सूचना, आक्षेप नोंदविण्याचे, लेखी निवेदन सादर करण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीचा समारोप करताना सर्व उपस्थितांचे आभार मानले. बैठकीत करंजविहिरे ग्रामस्थांनी या प्रकल्पास विरोध दर्शविलेला आहे. त्याची नोंद घेण्यात आलेली आहे.

सुनावणी दरम्यान म.प्र.नि.मंडळास खालील हरकती प्राप्त झाल्या.

१) ग्रामपंचायत करंजविहीरे, मु. पो. करंजविहीरे, ता. खेड, जि. पुणे
२) ग्रामस्थ करंजविहीरे, मु. पो. करंजविहीरे, ता. खेड, जि. पुणे
३) श्री. तानाजी दिवेकर यांचा दि. २५/१०/२०२४ रोजीचा ई-मेल व्दारे प्राप्त हरकत अर्ज.

मा. अध्यक्षा यांच्या सूचनेनुसार पर्यावरण सल्लागाराच्या संस्थेमधील तज्ज्ञ व्यक्तींनी सदरहू प्रकल्पाची माहिती ग्रामस्थांना द्यावी. त्यामुळे त्यांच्या हरकती, शंका दूर करण्यास मदत होईल.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी परत एकदा उपस्थितांना त्यांचे प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही सूचना, प्रश्न, आक्षेप असल्यास ते उपस्थित करण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सर्व उपस्थितांचे बैठकीस उपस्थित राहिल्याबद्दल आभार मानले आणि जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले,

मा. अध्यक्ष यांचे आभार मानून जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

प्राप्त झालेल्या लेखी सूचना/आक्षेप (०३) सोबत जोडलेले आहेत.

**(बाबासाहेब कुकडे)**
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी
समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
पुणे - २,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
पुणे

**(जगन्नाथ साळुंखे)**
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी
समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी-पुणे
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
पुणे

**(ज्योती कदम)**
अध्यक्षा,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, पुणे,
जिल्हा - पुणे